महाराष्ट्र शासन
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी-(महाराष्ट्र)
प्रशासकीय ईमारत, वसमत रोड,परभणी-431402
कुलसचिव कार्यालय
सत्यमेव जयते
कृषि मूलं हि जीवनम्
ईमेल :reg_mau@redifmail.com दुरध्वनी(02452) 229755 संकेतस्थळ: www.vnmkv.ac.in फॅक्स: (02452) 229755,223582

जा.क्र.ई निविदा अटी व शर्ती /२०२४/साप्रवि-६/4528

दिनांक २६.०९.२०२४

**वाचा:- विद्यापीठ परिपत्रक जा.क्र.ई निविदा/परिपत्रक/२०२४/साप्रवि-६/३७७८ दि.०८.०८.२०२४.**

## शुध्दीपत्रक

वनामकृवि, परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त वाचा येथील विद्यापीठ परिपत्रकानुसार वनामकृवि, परभणी अंतर्गत विविध कार्यालयीन व प्रक्षेत्रावरील कामे करण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करून घेण्याची ई निविदा प्रक्रिया राबविणेबाबत सुधारीत अटी व शर्ती बाबतचे परिपत्रक निर्गमीत करण्यात आले आहे. सदरील परिपत्रकातील ई-निविदेतील अटी व शर्ती मधील **लिफाफा अ मधील अट क्र.१६-** निविदाधारक किंवा संस्था यांच्या विरोधात कुठेही व कोणत्याही प्रकारची तक्रार / गुन्हा दाखल नसल्याचे अथवा कोणत्याही फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल नसल्याचे रूपये ५००/- च्या बंधपत्रावर शपथपत्र बंधनकारक राहील. हि अट शिथील करणे बाबतचे अनेक वेळा लोकप्रतिनिधीची व संबधीत कंत्राटदारांची निवेदने प्राप्त झालेली आहेत.

त्यानुषंगाने ज्या प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांवर गुन्हे दाखल आहेत व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. अशा कंत्राटदारांनी रु.५००/- च्या बंधपत्रावर, अशा प्रकारचे गुन्हे आम्ही या पुढे करणार नाही तसेच या संदर्भात मा.न्यायालयाचा व विद्यापीठ कार्यकारी परिषदेचा निर्णय आम्हाला मान्य राहील अशा स्वरुपाचे शपथपत्र घेण्यात यावे अशा स्वरूपाचा निर्णय घेण्यात आला आहे.

सबब,ज्या प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांवर गुन्हे दाखल आहेत व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. अशा प्रकल्पग्रस्त कंत्राटदारांना ई-निविदेत सहभागी होण्यासाठी मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तसेच विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या निर्णयाच्या अधिन राहुन तात्पुरते पात्र समजण्यात येत आहे. करीता **लिफाफा अ मधील अट क्र.१६ ही** अट सदरील परिपत्रकातून तात्पुरती वगळण्यात येत असून परिपत्रकातील उर्वरीत मजकुर, अटी व शर्ती जशास तशा राहतील.

**मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने.**

(संतोष वेणीकर)
कुलसचिव

**प्रतिलिपी:**

संचालक शिक्षण / संचालक संशोधन /संचालक विस्तार शिक्षण / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, वनामकृवि परभणी यांना देवून कळविण्यात येते की; सदरील शुध्दीपत्रक आपल्या अधिनस्त कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणून दयावे.

प्रत: १. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील शुध्दीपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

२. मा.कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव,वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव